बीड । महाराष्ट्र
सोमवार दि. ९ मार्च २०२६
वर्ष ५ वे । अंक ३३६
पान १ । पाने ४
किंमत ३ रूपये

महाराष्ट्राचा बुलंद आवाज । दैनिक

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955 | E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com

RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 | https://marathwadapatra.com | https://epaper.marathwadapatra.com










# भारताने इतिहास रचला!

## सलग दुसऱ्यांदा टी-२० वर्ल्ड कपवर कोरलं नाव



मुंबई । वृत्तसेवा

आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक २०२६ च्या अंतिम सामन्यात भारताने शानदार विजय मिळवला. अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या सामन्यात होत आहे. नाणेफेक जिंकल्यानंतर न्यूझीलंडने भारतीय संघाला फलंदाजीसाठी आमंत्रित केलं होतं. भारताने न्युझीलंडसमोर २५६ धावांचे आव्हान दिलं होतं. या आव्हानाचे पाठलाग करताना किवीच्या फलंदाजांना नाकीनऊ आले. भारतीय गोलंदाजांनी किवीच्या फलंदाजांना मोठी खेळी करू दिली नाही. जसप्रीत बुमराह आणि अक्षर पटेल यांनी शानदार गोलंदाजी केली. बुमराहने ४ विकेट घेतल्या.

### सॅमसन, अभिषेक, ईशानचं वादळ

अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवरच्या या सामन्यात टीम इंडियाने २० षटकांत पाच बाद २५५ धावांची मजल मारली. सलामीच्या संजू सॅमसननं सलग तिसऱ्या सामन्यात झळकावलेलं वेगवान अर्धशतक भारताच्या या डावाचं प्रमुख वैशिष्ट्य ठरलं. त्याने ४६ चेंडूंत पाच चौकार आणि आठ षटकारांसह ८९ धावांची खेळी उभारली. संजू सॅमसननं अभिषेक शर्माच्या साथीनं पहिल्या विकेटसाठी ९८ धावांची आणि ईशान किशनच्या साथीनं दुसऱ्या विकेटसाठी १०५ धावांची भागीदारी रचली.

## ‘मी तुमची सावित्रीबाई फुले’ एकपात्री प्रयोगाचे आयोजन



आष्टी । प्रतिनिधी

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून आष्टी येथे महिलांसाठी विशेष प्रेरणादायी सांस्कृतिक व मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार, दि. ९ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता आष्टी पंचायत समितीच्या प्रांगणात मुंबई महानंद संचालिका सौ.प्राजक्ता ताई सुरेश धस यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न होणार असून परिसरातील महिलांसाठी ही एक विशेष पर्वणी ठरणार आहे. या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित ‘मी तुमची सावित्रीबाई फुले’ हा प्रभावी एकपात्री प्रयोग होणार ▶▶ पान २ वर

### हायवे रोडवर दरोडा टाकणाऱ्या

## टोळीवर ‘मिनी मकोका’

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील वाढत्या चोरी, घरफोडी आणि दरोड्याच्या घटनांवर आळा घालण्यासाठी बीड जिल्हा पोलीस प्रशासनाने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत यांनी कार्यभार स्वीकारल्यानंतर गंभीर गुन्हे करणाऱ्या टोळ्यांवर विशेष लक्ष ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. याच अनुषंगाने हायवे रोडवर दरोडा टाकणाऱ्या टोळीवर भारतीय



न्याय संहिता कलम १११ अंतर्गत संघटित गुन्हेगारी अर्थात मिनी मकोका लागू करण्यात आला आहे. दि. ४ डिसेंबर २०२५ रोजी फिर्यादी शिवप्रसाद किशोर कुमार पौने (वय३२, रा. कल्पना सोसायटी, गणेशनगर, खुदबुल्लापूर, जि. रंगारेड्डी, तेलंगणा) यांनी गेवराई पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, ते कुटुंबासह खासगी कारने शिर्डीकडे दर्शनासाठी जात असताना रात्री सुमारे १२.३० वाजता शिवशारदा शाळेजवळ गाडी थांबवली. त्यावेळी चार अज्ञात आरोपींनी ▶▶ पान २ वर

### केवायसी न केलेल्यांना

## गॅस सिलिंडर मिळणार नाही

मुंबई । वृत्तसेवा

केवायसी न केलेल्या ग्राहकांसाठी महत्वाची बातमी आहे. केवायसी न केलेल्या ग्राहकांना घरगुती गॅस सिलिंडर आता मिळणार नाही. दोन सिलिंडरमधील अंतर २१ दिवसांवरून ३० दिवसांवर करण्यात आले आहे. सिलिंडर मिळण्यासाठीच्या दिवसांमध्ये ८ दिवसांची वाढ करण्यात आली आहे. अनेक ग्राहकांचे केवायसी प्रलंबित असल्याने वितरकांकडे गॅसचा साठा कमी आहे. त्यामुळे घरगुती गॅसची टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. नागरिकांनी गॅस काटकसरीने वापरण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. गेल्या काही दिवसांपासून जगावर युद्धाचे सावट आहे. इराण-इस्राइलमध्ये युद्धाचा भडका उडला आहे. त्याचा परिणाम आता सर्वच देशांना बसताना दिसत आहेत. इराणवर हल्ले होत असल्यामुळे इंधनाचा साठा भारतात येण्यामध्ये अडचणी होत आहेत. याचा परिणाम म्हणजे ग्राहकांच्या खिशावर बसत आहे. पेट्रोल-डिझेलच्या आणि गॅस सिलिंडरच्या किंमतीत वाढ होण्याची शक्यता आहे. आता गॅस तुटवडा निर्माण झाल्यामुळे कंपन्यांनी गॅस सिलिंडर देण्याच्या नियमांमध्ये देखील बदल केला आहे.

## केज, अंबाजोगाईत एमआयडीसी मंजूर करा

### आ.नमिता मुंदडा यांची सभागृहात आग्रही मागणी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

महाराष्ट्र विधानसभेच्या अधिवेशनादरम्यान आमदार नमिता मुंदडा यांनी केज आणि अंबाजोगाई तालुक्यांत औद्योगिक वसाहतींच्या (एमआयडीसी) निर्मितीसाठी आग्रही मागणी केली. या भागातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांना स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी आणि औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी या दोन्ही ठिकाणी एमआयडीसी मंजूर करणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. राज्यात बहुतेक तालुक्यांमध्ये एमआयडीसीचे जाळे विस्तारलेले असताना केज आणि अंबाजोगाई यांसारख्या महत्त्वाच्या तालुक्यांमध्ये अद्याप औद्योगिक क्षेत्राचा अभाव आहे. या भागामध्ये



मोठ्या प्रमाणावर कौशल्यप्राप्त मनुष्यबळ उपलब्ध असून हे भौगोलिक क्षेत्र गुंतवणूकदारांसाठीही अत्यंत सोयीचे आहे, असे मत आमदार मुंदडा यांनी मांडले. स्थानिक युवकांना त्यांच्याच भागात हक्काचा रोजगार मिळावा, या उद्देशाने त्यांनी सरकारला या प्रस्तावांवर त्वरित कार्यवाही करण्याची विनंती केली आहे. केज आणि अंबाजोगाई एमआयडीसी संदर्भातील प्रस्ताव सध्या शासनाकडे प्रलंबित असून त्यांना तातडीने प्रशासकीय मान्यता देऊन या भागातील औद्योगिकीकरणाचा मार्ग मोकळा करावा, असे आवाहन त्यांनी आपल्या भाषणात केले. या निर्णयामुळे केवळ बेरोजगारांचा प्रश्न सुटणार नाही, तर संपूर्ण जिल्ह्याच्या आर्थिक विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

## लाडक्या बहिणींमुळे अर्थव्यवस्थेत भर

मुंबई । वृत्तसेवा

लाडकी बहीण योजना राज्य सरकारच्या विविध योजनांशी जोडून लाडक्या बहिणींना उद्योजिका बनविण्याचा निर्णय सरकारने घेतला असून यामुळे अर्थव्यवस्थेत भर पडणार आहे अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाईंदर जवळील उत्तन येथे दिली. उत्तन येथील रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी आणि महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (एमएसआरएलएम) यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनाच्या निमित्त विकसित भारत नारी शक्ती संगम या दोन दिवसीय ग्रामीण महिला नेतृत्व परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेचे उद्घाटन शनिवारी (ता.८ ) मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, राज्य सरकारच्या विविध योजनांचा लाभ मिळावा ▶▶ पान २ वर

### महिला दिनानिमित्त तुलसी शैक्षणिक समूहाचा उपक्रम

## बीडमध्ये ‘महिला मॅरेथॉन’ उत्साहात



बीड । प्रतिनिधी

जागतिक महिला दिनानिमित्त तुलसी शैक्षणिक समूह, बीड यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेली ‘महिला मॅरेथॉन’ स्पर्धा रविवार दि.८ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या स्पर्धेत शालेय विद्यार्थिनींपासून ते ज्येष्ठ महिलांपर्यंत सर्व वयोगटातील शेकडो महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आरोग्यजागृती आणि महिला सक्षमीकरणाचा संदेश दिला. महिला दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या महिला मॅरेथॉन स्पर्धेचे उद्घाटन बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जात पडताळणी विभागाचे सहाय्यक उपायुक्त उमेश सोनवणे तसेच तुलसी शैक्षणिक समूहाचे संचालक प्रा.प्रदीप रोडे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी महिला दिनानिमित्त मॅरेथॉनसारख्या उपक्रमाचे आयोजन केल्याबद्दल ▶▶ पान २ वर

## सरकार विरोधात कॉंग्रेसची पदयात्रा

मुंबई । वृत्तसेवा

केंद्र सरकार हे शेतकरी विरोधी असून अमेरिकेबरोबर केलेल्या व्यापार करारामुळे देशातील शेतकरी व कृषी क्षेत्र देशोधडीला लागणार आहे. आधीच अस्मानी सुलतानी संकटात पिचलेल्या शेतकऱ्यांसाठी व्यापारी करार हा मोठा आघात आहे. या करारामुळे भारतातील शेतमालाला भाव मिळणार नाही. ग्रामीण भागातील गरीब, कष्टकऱ्यांसाठी युपीए सरकारने आणलेली मनरेगा ही हक्काची रोजगार देणारी योजनाही भाजपा सरकारने मोडीत काढली आहे. केंद्रातील सरकारबरोबरच राज्यातील सरकारही शेतकरी विरोधी असून गरज नसताना शक्तीपीठ महामार्ग प्रकल्प आणून शेत जमीन बळकावण्याचा प्रयत्न सुरू आहे. शेतकऱ्यांचा या शक्तीपीठाला तीव्र विरोध आहे पण सरकार मात्र या विरोधाकडे ▶▶ पान २ वर

मराठवाडा पत्र



## संपादकीय

# भविष्यवेधी संकल्प

कोणत्याही राज्याचा अर्थसंकल्प म्हणजे मुद्दलात 'जमा–खर्चाचा वार्षिक ताळेबंद'च असतो. पण, राज्याच्या उत्पन्नाचे स्त्रोत काय आहेत आणि उत्पन्नाचा विनियोग राज्यकर्ते कोणत्या प्राधान्यक्रमाने करताहेत, यावरून राज्याचा इतिहास–वर्तमान आणि भविष्य अशा तीनही काळांचं स्वच्छ दर्शन होतं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत 'समृद्ध महाराष्ट्राचा भविष्यवेधी अर्थसंकल्प' सादर केला. नव्या पिढीतील नेतृत्वाकडे राज्यांची सूत्रं गेल्यापासून साधारणतः गेल्या दहा वर्षांत देशातील अनेक राज्यांत परकीय गुंतवणुकीसाठी, केंद्राच्या योजनांमध्ये अधिक वाटा मिळवण्यासाठी, नवोद्योग आणि नवोपचारांना आकर्षित करण्यासाठी, पायाभूत सुविधांच्या विस्तारातून आपलं राज्य अधिकाधिक उद्योगस्नेही करण्यासाठी निकोप स्पर्धा सुरू आहे. या सर्व नवनेतृत्वामध्ये फडणवीस यांचा नंबर सर्वात वर आहे. त्यामुळे, महाराष्ट्रातील कारभाराकडे, इथल्या योजना आणि त्यासाठीच्या विविध तरतुदींकडे इतर राज्यांचं बारकाईने लक्ष असतं. त्या सर्व विकासेच्छु नवनेतृत्वाने अनुकरण करावं, असाच महाराष्ट्राचा यंदाचा अर्थसंकल्प आहे, यात वाद नाही. फडणवीस यांच्या दूरदृष्टीचा, सम्यक विचारांचा आणि विकासशील नीतीचा प्रत्यय त्यातील वाक्या–वाक्यातून येतो आहे. कोणत्याही राज्याचा अर्थसंकल्प म्हणजे मुद्दलात 'जमा–खर्चाचा वार्षिक ताळेबंद'च असतो. पण, राज्याच्या उत्पन्नाचे स्त्रोत काय आहेत आणि उत्पन्नाचा विनियोग राज्यकर्ते कोणत्या प्राधान्यक्रमाने करताहेत, यावरून राज्याचा इतिहास–वर्तमान आणि भविष्य अशा तीनही काळांचं स्वच्छ दर्शन होतं. सामाजिक व्यवहाराच्या प्रत्येक क्षेत्राचा विचार करून, त्यातल्या बाबींवर भरघोस तरतुदी करूनही राजकोषीय तूट स्थूल उत्पन्नाच्या तीन टक्क्यांच्या आत ठेवण्याचं कौशल्य अर्थसंकल्पात साधलं आहे, हे विशेष. देशातली सगळीच राज्यं कर्जांच्या ओझ्याखाली वाकत चालली आहेत. वाढतं शहरीकरण, या शहरांना सुविधा पुरवण्याचा ताण, अस्थिर राजकारण आणि त्यामुळे करावा लागणारा मतदाराचा अधिकाधिक अनुनय, त्यातून आलेल्या 'फुकट वाटप योजना' आणि कर आकारणीचं केंद्रीकरण, यांमुळे राज्य कात्रीत सापडली आहेत. महाराष्ट्र यात वेगळा नाही. तरीही यावेळचा अर्थसंकल्प सर्वंकष वाटतो आहे, तो फडणवीस यांच्या धाडस आणि आत्मविश्वासामुळे. वातावरणीय बदल, पर्यावरणाचं रक्षण, सार्वजनिक स्वच्छता, नैसर्गिक संसाधनांचे कार्यक्षम व्यवस्थापन आणि किफायती वापर, अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराला प्रोत्साहन, त्यासाठी तंत्रशिक्षणाचा प्रसार, सर्वांसाठी आरोग्य आणि रोजगाराच्या पुरेशा संधी हे आजच्या 'जेन–झीं'चे जिव्हाळ्याचे मुद्दे आहेत. अर्थसंकल्पाने या सगळ्याच क्षेत्रांना योग्यरीत्या न्याय दिला असून त्यातून राज्याची भविष्याची दिशाही स्पष्ट केली आहे. राज्यासाठी आणि राज्यातील जनतेसाठी अत्यंत दिलासादायक अर्थसंकल्प म्हणून या अर्थसंकल्पाची नोंद करावी लागेल. महाराष्ट्र हे देशातील विकसित राज्य आहे. विकसित राज्यासमोरही अनेक आव्हानं असतात. मागास राज्यांची थोडीशी प्रगतीही आकड्यांमध्ये, टक्केवारीत मोठी दिसते. विकसित राज्यांचं तसं नसतं. एका विशिष्ट स्थितीला पोहोचल्यानंतर त्यानंतरची प्रगती आकड्यांमध्ये धीम्या गतीनेच पुढे सरकताना दिसते. विकसित राज्यातील जनतेच्या आकांक्षाही विकसितच असतात! त्या आकांक्षांना पुरं पडण्यासाठी करावी लागणारी गुंतवणूक, नावीन्यपूर्ण कल्पनांचे प्रयोग राबवण्यासाठी घ्यावी लागणारी जोखीम सोपी नसते. राज्य प्रगतीच्या वरच्या टप्प्यावर पोहोचल्यानंतर राज्यकर्त्यांसमोर उभी राहणारी आव्हानंही त्याच उंचीची असतात. कालच्या अर्थसंकल्पात या आव्हानांची जाणीव पदोपदी दिसते आहे. देशातलं प्रगत राज्य शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्येही गेली काही वर्षं आघाडीवर आहे. परस्परविरोधी; पण हे सत्य आहे. हा विरोधाभास संपवण्याच्या दिशेने आणखी एक पाऊल म्हणून या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना जाहीर केलेली कर्जमाफी निश्चितच दिलासादायक ठरू शकते. एकूण कर्जातला दोन लाखांचा वाटा सरकारने उचलला, तरी बऱ्याच शेतकऱ्यांना त्यातून पुढच्या प्रयत्नांसाठी दिलासा मिळू शकतो. अशी कर्जमाफी यापूर्वी झाली नाही, असं नाही. त्या प्रत्येक वेळी तात्कालिक दिलासाही मिळाला. तो आवश्यक असला, तरी त्याने समस्या संपली नाही. पशुपालन, मत्स्यव्यवसायाची जोड हेच शेतीतल्या समस्यांना अधिक शाश्वत उत्तर आहे. 'प्राकृतिक शेती अभियान', 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजक योजना', आणि 'मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजना' समस्येवरचा दीर्घकालीन आणि शाश्वत उपाय ठरू शकतात. महाराष्ट्राच्या कृषी अर्थव्यवस्थेसाठी आवश्यक वीज, पाणी आणि अर्थ पुरवठा या तिन्हींचाही अर्थसंकल्पात साकल्याने केलेला विचार ग्रामीण महाराष्ट्रात नवचैतन्य आणल्याशिवाय राहणार नाही. परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यात महाराष्ट्र हे देशातलं पहिल्या क्रमांकाचं राज्य आहे. हल्ली असा एकही आठवडा जात नाही, जेव्हा कोणत्या ना कोणत्या राष्ट्राचा प्रमुख किंवा औद्योगिक शिष्टमंडळ मुंबई भेटीवर नसतं. फडणवीस यांनी या आघाडीवर राज्याची आघाडी कायम ठेवली आहेच; पण अशा गुंतवणूकदारांना अधिकाधिक संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी पायाभूत विकासासाठी केलेल्या तरतुदी अधिक आश्वासक आहेत. राज्यात आठ ते दहा 'एज्युसिटी' विकसित करण्याची, महामुंबईत नवी झोपडी उभी राहू नये यासाठी 'नो न्यू स्लम फ्रेमवर्क', मुंबई आणि परिसरातील वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून भुयारी मार्गांचं जाळं, समृद्धी महामार्गाला मालवाहतूक कॉरिडॉरची जोड, 'महाराष्ट्र आरोग्य सार्वजनिक संस्थे'ची स्थापना किंवा कर्करोग, मधुमेह, हृदयरुग्णांच्या निदानासाठी ग्रामीण महाराष्ट्रात ४ हजार ५०० कोटी रुपयांचा निधी ह्या या अर्थसंकल्पातील विचारांची खोली दर्शवणाऱ्या बाबी आहेत. राज्याच्या विकासाच्या अंगोपांगांचा विचार करून काळाची पावलं आणि गती ओळखून तयार केलेला हा अर्थसंकल्प म्हणूनच कौतुकास्पद आहे. महात्मा फुले यांचं २०० वं जयंती वर्ष आणि संत गाडगेबाबांचं १५०वं जयंती वर्ष साधून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मरणासह हे वर्ष 'सामाजिक समता आणि समरसता वर्ष' म्हणून साजरं करण्याची कल्पना मांडून महायुतीने आपल्या सर्वसमावेशक विकासरथावर सामाजिक न्यायाचं जे निशाण फडकावलं आहे, ते सर्वार्थसूचक आहे!

## डॉ.आदिती सारडा फिनिक्स महिला प्रेरणा पुरस्काराच्या योग्य मानकरी–संतोष मानूरकर

# स्त्री ही केवळ कुटुंबाची नव्हे तर संपूर्ण समाजाच्या प्रगतीची–डॉ.आदिती सारडा

**बीड** । प्रतिनिधी

आदित्य शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रामध्ये डॉ. आदिती सुभाष सारडा यांचे काम निश्चितच कौतुकास्पद आहे. बीड जिल्ह्याचे सर्वांगीण वैभव वाढवण्यामध्ये सारडा परिवाराचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याने आज जागतिक महिला दिनी डॉ. आदिती सारडा यांना पत्रकार संघाच्या वतीने दिलेला फिनिक्स महिला प्रेरणा पुरस्कार योग्य आणि कौतुकास्पद आहे असे स्पष्टमत ज्येष्ठ पत्रकार संतोष मानूरकर यांनी व्यक्त केले. तर स्त्री ही केवळ कुटुंबाची नव्हे तर संपूर्ण समाजाच्या प्रगतीची शक्ती आहे. तिचा सन्मान आणि समानता हीच खऱ्या प्रगतीची गुरुकिल्ली आहे. जर महिलांच्या हातात सत्ता म्हणजेच प्रशासन असेल तर सुशासन निर्माण होते, एक चांगली शिस्त लागते हे मी आदित्य ग्रुपच्या माध्यमातून आपल्या सगळ्यांच्या आशीर्वादामुळे करू शकले. असा विश्वास सत्कारमूर्ती डॉक्टर आदिती सारडा यांनी सत्काराला उत्तर देताना व्यक्त केला. जागतिक महिला दिनानिमित्त रविवार दिनांक ८ मार्च रोजी बीड येथील जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई आणि दैनिक समर्थ राजयोगच्या वतीने सामाजिक जाणीव ठेवणाऱ्या उपक्रमाने जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. बेघर निवारा केंद्रातील पुनर्वसित झालेल्या ६ महिलांना प्रमुख अतिथी डॉ. आदिती सुभाषचंद्र सारडा यांच्या शुभहस्ते साडीचोळी, सन्मानपत्र आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर पत्रकार संघाच्या वतीने देण्यात येणारा सन्मानाचा फिनिक्स महिला प्रेरणा पुरस्कार २०२६ हा डॉ. आदिती सुभाषचंद्र सारडा यांना ज्येष्ठ पत्रकार संतोष मानूरकर आणि कार्यक्रमाचे आयोजक पत्रकार वैभव विवेक स्वामी, पत्रकार शेख आयेशा, सामाजिक कार्यकर्त्या सौ मनिषा स्वामी, काळजीवाहक छाया सरोदे तसेच उपस्थित सर्व मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानपत्र, पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ देऊन शानदार गुणगौरव करण्यात आला. यावेळी जिव्हाळा बेघर निवारा केंद्रातील प्रत्येक लाभार्थ्यांच्या व्यथा ऐकून संवेदनशील झालेल्या सत्कारमूर्ती डॉ. आदिती सारडा यांनी भावनिक होऊन आपले अनमोल असे विस्तृत मार्गदर्शन केले. त्या पुढे म्हणाल्या की,आज मला या ठिकाणी सत्काराच्या निमित्ताने येण्याची संधी मिळाली. माझ्या डोळ्याने येथील व्यथा बघितल्यावर माझी समाजाकडे बघण्याची दृष्टी खऱ्या अर्थाने बदलली आहे.आम्ही जे काही काम विद्यार्थ्यांसाठी करतो त्यावेळी आमचे व्यक्तिगत काम आम्हाला बाजूला ठेवावे लागते आणि प्राधान्य विद्यार्थ्यांना द्यावे लागते. त्यामुळे आम्ही खूप त्याग करतो असे कधी कधी वाटत होते. पण आमच्या पेक्षाही जास्त त्याग येथे काम करणाऱ्या आणि अशा पद्धतीने काम करणाऱ्या अनेकांचा आहे. त्यामुळे आज माझा सत्कार एका चांगल्या समूहामध्ये झाला. आणि या कार्यक्रमामुळे त्यांच्या चेहऱ्यावर जो आनंद निर्माण झाला यातच या उपक्रमाचे यश आहे. असे स्पष्ट करून त्या म्हणाल्या, पत्रकार वैभव स्वामी यांनी आज पुनर्वसित झालेल्या महिलांना माझ्या शुभहस्ते सन्मानित करून खऱ्या अर्थाने सामाजिकतेची जाणीव करून दिली आहे. आजचा हा सोहळा माझ्यासाठी अविस्मरणीय ठरला आहे,अशी भावना व्यक्त केली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिव्हाळा बेघर केंद्राचे संचालक राजू वैद्य यांनी सविस्तरपणे केले.तर सत्कारमूर्तींच्या व्यथा आणि बेघर निवारा केंद्राची यशस्वी गाथा मुख्य व्यवस्थापक राजू वंजारे यांनी विस्तृतपणे अंगावर शहारे आणणाऱ्या शब्दांनी व्यक्त केली. या कार्यक्रमास पत्रकार, प्रतिष्ठित, शिक्षण प्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्नेहभोजनाने या कार्यक्रमाची गोड सांगता झाली.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पत्रकार वैभव स्वामी यांनी पुढाकार घेतला.



## पान १ वरून

### टोळीवर मिनी...

गाडीची चावी काढून गाडीचे नुकसान केले आणि लोखंडी रॉडने मारहाण करत धमकावून सुमारे ३ लाख ४६ हजार रुपये किमतीचे सोन्या–चांदीचे दागिने जबरदस्तीने लुटून नेले. या घटनेचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अण्णासाहेब पवार करत आहेत. तपासादरम्यान या गुन्ह्यात एकूण सहा आरोपींचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले असून त्यापैकी तीन आरोपींना अटक करण्यात पोलीसांना यश आले आहे. अटक आरोपींची नावे : १) राहुल अनिल काळे (वय १९) २)विकास अनिल काळे (वय २१) ३) अनिल रामा काळे (वय ४०)(सर्व रा. खामकरवाडी, ता. वाशी, जि. धाराशिवया तिघांना दि. १२ डिसेंबर २०२५ रोजी अटक करण्यात आली. पोलीस कोठडीदरम्यान त्यांच्या ताब्यातून ४ लाख २९ हजार रुपयांचे सोन्या–चांदीचे दागिने व रोख रक्कम जप्त करण्यात आली. तसेच गुन्ह्यात वापरलेली सुमारे १० लाख रुपये किंमतीची हेक्टर चारचाकी गाडीही जप्त करण्यात आली आहे. या गुन्ह्यातील इतर तीन आरोपी सध्या फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. तपासात असेही निष्पन्न झाले की, या टोळीच्या प्रमुखाने संघटित पद्धतीने टोळी तयार करून बीड जिल्ह्यात पाच गंभीर गुन्हे केले आहेत. शस्त्रांचा धाक दाखवून आर्थिक फायद्यासाठी हे गुन्हे केल्याचे स्पष्ट झाल्याने पोलीस अधीक्षक नवनीत कॉँवत यांनी पोलीस ठाणे गेवराई गुन्हा क्रमांक ७१४/२०२५ मध्ये भारतीय न्याय संहिता कलम ३०९(६), ३१०(२), ३२४(४) सोबतच कलम १११ (संघटित गुन्हेगारी – मिनी चउजउ–) लागू करण्यास परवानगी दिली. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉँवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके आणि पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या कारवाईत पो.नि. किशोर पवार, सपोनि अण्णासाहेब पवार, पोलीस कर्मचारी कल्याण राठोड, कांबळे तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे अभिमन्यू औताडे, बिबीषण चव्हाण आणि शेख अलीम यांचा सहभाग होता. दरम्यान, भविष्यातही अशा संघटित गुन्हेगारी टोळ्यांवर मोक्का किंवा मिनी मोक्का सारखी कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही पोलीस अधीक्षक नवनीत कॉँवत यांनी दिला आहे.

### बीडमध्ये महिला...

आयोजकांचे कौतुक केले. त्यांनी सांगितले की, विविध ठिकाणी आयोजित मॅरेथॉनमध्ये महिलांचा सहभाग तुलनेने कमी असतो, मात्र बीडमध्ये शंभर टक्के महिलांचा सहभाग दिसून येणे ही अभिमानाची बाब आहे. तसेच त्यांनी बीड जिल्ह्यातील बालविवाह आणि मुलींच्या शिक्षणातील गळतीच्या प्रश्नावरही प्रकाश टाकत समाजाने याबाबत जागरूक राहण्याचे आवाहन केले.अशा स्पर्धांमधून महिलांचा आत्मविश्वास वाढतो आणि समाजात सकारात्मक संदेश पोहोचतो, असे त्यांनी नमूद केले. सकाळी ६ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथून मॅरेथॉनला सुरुवात झाली. नगर रोड मार्गे पुन्हा सामाजिक न्याय भवन असा सुमारे ७ कि.मी.चा मार्ग स्पर्धकांनी उत्साहाने पार केला. १० ते १८ वर्षे आणि १८ वर्षांवरील अशा दोन गटांत ही स्पर्धा पार पडली. दोन्ही गटांत चुरशीची स्पर्धा पाहायला मिळाली. स्पर्धेच्या शेवटी विजेत्या महिलांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यामध्ये गट–अ (१० ते १८ वर्षे) या गटात कु.दिव्या राठोड हिने २९ मिनिटांत शर्यत पूर्ण करत प्रथम क्रमांक पटकावला. तिला १५,००० रुपये रोख पारितोषिक, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. द्वितीय क्रमांक कु.अमृता वायकर तर तृतीय क्रमांक कु.अक्षरा शेलार यांनी मिळवला. त्यांना अनुक्रमे १०,००० व ७,००० रुपये रोख पारितोषिकांसह सन्मानित करण्यात आले. गट–ब (१८ वर्षांवरील) या गटात कु.परिमला बाबर हिने ३२ मिनिटांत शर्यत पूर्ण करत प्रथम क्रमांक मिळवला. तिला १५,००० रुपये रोख पारितोषिक, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. द्वितीय क्रमांक कु.ज्ञानेश्वरी गुजर, तर तृतीय क्रमांक कु.कांचन शिंदे यांनी मिळवला. त्यांनाही अनुक्रमे १०,००० व ७,००० रुपये रोख पारितोषिक, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. याशिवाय सर्व सहभागी स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा प्रशासन, योगा ग्रुप, बालाघाट ग्रुप, तसेच तुलसी शैक्षणिक समूहातील विविध युनिटचे प्राचार्य डॉ.विजयकुमार बांदल, प्रा.डी.डी.राऊत, प्रा.डी.जी निकाळजे, डॉ.सुनील जोंधळे, प्रा.प्रकाश ढोकणे, उमा जगतकर, डॉ.अश्विनी बेद्रे यांच्यासह शिक्षकवृंद व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. मॅरेथॉनला शहरातील नागरिक, पालक आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांचीही मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

### मी मुमची सावित्रीबाई...

असून या  या प्रयोगामध्ये सौ. मेघना झुझम (भिंबरकर पाटील) आपल्या प्रभावी अभिनयातून सावित्रीबाई फुले यांच्या जीवनातील संघर्ष, स्त्री शिक्षणासाठीचे त्यांचे कार्य आणि सावित्रीबाईची गाथा सांगणारी,पाहताना आश्रू येणारी कलाकृती तसेच समाजप्रबोधनाचा प्रेरणादायी संदेश जिवंत करणार असल्याची माहिती  या प्रयोगाविषयी माहिती सौ. प्राजक्ताताई सुरेश धस यांनी दिली आहे.

## पान १ वरून

याशिवाय महिलांच्या मनोरंजनासाठी व त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी 'होम मिनिस्टर खेळ पैठणीचा, सन्मान महिलांचा' या विशेष स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या महिलांना विविध खेळांद्वारे आपले कौशल्य दाखवण्याची संधी मिळणार असून विजेत्यांना आकर्षक पैठणीसह इतर बक्षिसे देण्यात येणार आहेत. परिसरातील सर्व महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

### सरकार विरोधात...

कानाडोळा करून त्यांच्या लाडक्या उद्योगपती मित्रासाठी शक्तीपीठ महामार्ग करण्यासाठी पोलीस बळाचा वापर करत आहे. भाजपा सरकारच्या या जुलमी, अत्याचारी, शेतकरी विरोधी धोरणाविरोधात कॉँग्रेस पक्षाने एल्गार पुकारला असून ९ मार्च रोजी कॉँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली कळमनुरी ते हिंगोली पदयात्रा काढण्यात येणार आहे. अमेरिकेबरोबरचा व्यापार करार, मनरेगा, शक्तीपीठ महामार्ग या प्रमुख मागण्याबरोबरच आदिवासी विशेष पदभरती, वनहक्क कायद्याची अंमलबजावणी, घरकुल योजना या मागण्यासाठीही हा महामोर्चा आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्र प्रदेश कॉँग्रेस कमिटीचे वरिष्ठ उपाध्यक्ष मोहन जोशी यांच्याकडे या यात्रेच्या समन्वयाची जबाबदारी असून प्रदेश उपाध्यक्ष सचिन नाईक यांच्यासह हिंगोली जिल्हा कॉँग्रेस कमिटीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

### लाडक्या बहिणींमुळे...

यासाठी मुंबई बँकेच्या मदतीने सुमारे साडे सहा हजार लाडक्या महिलांना बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून दिले. त्यासाठी हमी म्हणून लाडकी बहीण योजना असून योजनेतून मिळणारे  पैसे कर्जाचे हफ्ते म्हणून भरले जाणार आहेत. त्यामुळे या साडे सहा हजार महिला केवळ लाडकी बहीण योजनेचे पैसे घेत नाहित तर त्या आता उद्योजिका झाल्या आहेत. याच धर्तीवर सर्व लाडक्या बहिणींना आर्थिक गुंतवणूक व खर्च यासंदर्भातले प्रशिक्षण देऊन त्यांना उद्योजिका बनविण्यात येणार आहे. त्यामुळे अर्थव्यवस्थेत भर पडणार आहे अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.  जगात जेवढे विकसित देश आहेत त्यांची वाटचाल बघितली तर या देशांना तेव्हाच विकास करता आला ज्यावेळी त्या देशातील राज्यकर्त्यांना महिला या अर्थव्यवस्थेचे दुसरे चाक आहेत हे समजले. त्यामुळे या सर्व विकसित देशांनी त्या त्या काळात महिला केंद्रित धोरणे आखली, महिलांनी अर्थव्यवस्थेत योगदान द्यायला सुरुवात केल्यानंतर त्या देशांची विकासाच्या दिशेने वेगाने वाटचाल झाली, असे ते म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील विकसित भारत या संकल्पने अंतर्गत सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक व्यवस्थेची दिशा व सर्व योजना महिला केंद्रित करण्याचे काम केले.






Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# सुपर वुमन बाईक रॅलीने महिला दिन साजरा

## महिलांनो स्वतःच्या क्षमता ओळखा– जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनानिमित्त आज जिल्हा प्रशासन व शिक्षण विभागातील महिला अधिकारी–कर्मचाऱ्यांची सुपर वुमन बाईक रॅली काढण्यात आली. क्रांती चौकापासून सुरु झालेल्या या रॅलीचा जिल्हाधिकारी कार्यालयात समारोप झाला.



आज सकाळी साडेसात वा. क्रांती चौकात महिलांच्या बाईल रॅलीचा शुभारंभ झाला. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, उपजिल्हाधिकारी संगिता राठोड, शिक्षणाधिकारी माध्यमिक आश्विनी लाठकर, शिक्षणाधिकरी प्राथमिक जयश्री चव्हाण तसेच प्रशासनातील महिला अधिकारी – कर्मचारी या रॅलीत उत्साहात सहभागी झाल्या. रॅलीत महिला सक्षमीकरणाच्या घोषणांनी परिसर निनादून गेला. पैठण गेट, तापडिया रंगमंदिर मार्ग, महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यांना अभिवादन करत औरंगपुरा भाजी मंडी मार्गे जिल्हाधिकारी कार्यालय येथे या रॅलीचा समारोप झाला.

जिल्हाधिकारी कार्यालयात समारोप प्रसंगी जिल्हाधिकारी स्वामी यांनी महिलांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव केला. महिला ह्या समाजाचा निम्मा भाग



आहे. त्यांची बुद्धिमत्ता, शक्ती याचा उपयोग झाल्यास आपला समाज अनेक क्षेत्रात आघाडीवर जाईल.त्यासाठी महिलांनी स्वतः च्या क्षमतांना ओळखून त्याचा विकास करायला हवा,असे प्रतिपादन त्यांनी केले. प्रास्ताविक संगिता राठोड ह्यांनी तर आभार आश्विनी लाठकर यांनी मानले.

महिला या शक्तीचे स्वरुप असतात, गरज आहे ती फक्त महिलांनी स्वतःच्या क्षमता ओळखण्याची, अशा शब्दात जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी महिलांचा आत्मविश्वास वाढवला.

## जागतिक महिला दिनानिमित्त मातोश्री संस्थेचा बिबी गावात 'एक झाड एक जीवन' अभियान उत्साहात!



**बीड । प्रतिनिधी**

आज दि.०८.०३.२०२६ रोजी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून बीड येथील 'मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था' यांच्या वतीने बुलढाणा जिल्ह्यातील लोणार तालुक्यातील बिबी या गावात 'एक झाड, एक जीवन' हे महावृक्षारोपण अभियान नुकतेच मोठ्या उत्साहात पार पडले. महिलांच्या सक्षमीकरणासोबतच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.सध्याच्या काळात वाढते तापमान आणि पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास थांबवण्यासाठी वृक्षारोपण ही काळाची गरज बनली आहे. याच गोष्टीचे गांभीर्य ओळखून मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेने थेट बिबी गावात जाऊन या उपक्रमाची अंमलबजावणी केली. या अभियानांतर्गत गावातील विविध मोकळ्या जागांवर पिंपळ आणि सावली देणाऱ्या वृक्षांची लागवड करण्यात आली.याप्रसंगी 'एक झाड, एक जीवन' हा केवळ नारा नसून ती आपल्या भावी पिढीसाठी एक सुरक्षित गुंतवणूक आहे, असे महत्त्व पटवून देण्यात आले. विशेष म्हणजे महिला दिनाचे निमित्त असल्याने या वृक्षारोपण मोहिमेत बिबी गावातील महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. स्वतःच्या हाताने रोपे लावून, ती जगवण्याचा

## लोककला संवर्धन आणि जतन याविषयावर सौ. के.एस.के महाविद्यालयात ११ मार्चला राष्ट्रीय कार्यशाळा

**बीड । प्रतिनिधी**

येथील सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात नाट्यशास्त्र विभाग, संगीत विभाग आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ११ मार्च २०२६ रोजी लोककला संवर्धन व जतन या विषयावर राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात येत असल्याचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर आणि कार्यशाळा समन्वयक तथा उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळाणकर यांनी कळविले आहे.

दिनांक ११ मार्च २०२६ रोजी सौ. के. एस. के. महाविद्यालयात लोककलेच्या कार्यशाळेचे आयोजन सकाळी १०.०० वाजेपासून होणार आहे. मुंबई विद्यापीठाचे लोककला




अकादमीचे प्रमुख डॉ. गणेश चंदनशिवे तसेच प्रमुख अतिथी म्हणून बीड नाट्य परिषदेच्या अध्यक्ष, प्राचार्य दीपा क्षीरसागर, नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. योगेश क्षीरसागर उपस्थित राहणार आहेत या कार्यशाळेत लोककलेचे सादरीकरण आणि त्यावर चर्चा होणार आहे, यात डॉ. गणेश चंदनशिवे,मुंबई. शाहीर संतोष साळुंके, लातूर . डॉ.साहिश देशपांडे, गोवा. गोमंत लोककला, डॉ. सुधीर निकम, बीड. डॉ. गणेश शिंदे , धाराशिव. शाहीर विलास सोनवणे, गेवराई. अनामिका आहिरे, बीड हमीद असीम सय्यद, शेवगाव, भगवान राऊत, अहिल्यानगर. विलास हरगावकर, आदी तज्ञ अभ्यासकांचे सादरीकरण आणि मार्गदर्शन होणार आहे. तसेच लोकवाद्य प्रदर्शन आणि लोक वाद्यवृंद सादरीकरण यात डॉ. राहुल सोनवणे, प्रा. दीपक जमदाडे, सुरेश थोरात, पवन शिंदे, नितीन प्रधान, इंद्रजीत भांगे, आदिंचे सादरीकरण होणार आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर या विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांतील लोककलेचा सर्वे क्षण अहवाल डॉ. जयंत शेवतेकर सादर करणार आहे. कार्यशाळे दरम्यान येणाऱ्या सहभागी प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी, अभ्यासक, कलावंत यांनी आपले संशोधन निबंध पाठवावे असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, कार्यशाळा समन्वय उपप्राचार्य तथा नाट्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संजय पाटील देवळाणकर, उपप्राचार्य अनिता शिंदे, पदव्युत्त विभाग प्रमुख डॉ. खान ए. एस., डॉ राहुल सोनवणे डॉ. दुष्यंत रामटेके, प्रा. विजयकुमार राख, डॉ.असलम सय्यद आदींनी केले आहे अधिक माहितीसाठी पुढील क्रमांकावर संपर्क साधावा पाटील ९४२२२९५३१४, सोनवणे ९८२२५७७६७१

## संस्कारमध्ये 'आनंददायी शनिवार ' या उपक्रमाचे निरंतर आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

येथील संस्कार विद्यालयातील इयत्ता पहिली दुसरी विभागात शासनाने ठरवून दिलेल्या 'आनंददायी शनिवार' या उपक्रमांतर्गत पाठ्यक्रमावर आधारित विविध शैक्षणिक कृतींचे प्रत्येक शनिवारी निरंतर आयोजन करण्यात येते. या उपक्रमा अंतर्गत शासनाच्या आदेशान्वये दप्तराविना शाळा घेऊन मनोरंजनातून प्रात्यक्षिकातून अध्ययन क्षमता विकसित करणे हा उद्देश असतो. त्या अनुषंगाने संस्कारमध्ये विविध विषयांचे शनिवारी नियोजन करून हा उपक्रम यशस्वीरित्या घेण्याचा प्रयत्न केला जातो .

या उपक्रमांतर्गत मराठी कविता ,कला गीते अभिनयासह शिक्षकांनी सादर करतात व विद्यार्थ्यांकडून करून घेतली जातात . गणित विषयातील भूमितीय आकारांची ओळख ,भारतीय नाणी – नोटाची ओळख, पाढे पाठांतर , एकक – दशक संकल्पना, मूल्यवाचक व क्रम वाचक संख्येतील फरक हे घटक शैक्षणिक साहित्याचा वापर करून प्रात्यक्षिकरित्या शिकवली जातात . इंग्लिश विषयातील विविध कविता अभिनयासह घेतल्या जातात .विविध ऍक्टिव्हिटी घेतल्या जातात. शारीरिक शिक्षणाततील विविध व्यायाम प्रकार , कवायत, विविध योगासनांचे प्रकार, आनंददायी खेळ घेऊन वैयक्तिक स्वच्छता व सामूहिक स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यात येते. कार्यानुभव विषयातील विविध मातीच्या व कागदाच्या कलाकृती विद्यार्थ्यांकडून बनवून घेतल्या जातात. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या विविध विषयातील अध्ययन क्षमता दृढ होण्यास मदत होते. सर्वांच्या सहकार्याने नियोजनपूर्वक 'आनंददायी शनिवार ' उपक्रम घेतले जातात.

# चांदापुर येथे बाराव्या बौद्धधम्म परिषदेचा शानदार समारोप

## जगाला युद्धाची नाही तर बुध्दाची गरज : पुज्य भिक्खू करूणानंद महाथेरो

**परळी । प्रतिनिधी**

परळी तालुक्यातील वसंतनगर तांडा, मौजे चांदापुर (तिर्थक्षेत्र दर्जा – क प्राप्त) येथे प्रतिवर्षी प्रमाणे यावर्षी ही शनिवार, दिनांक ७ मार्च २०२६ रोजी बाराव्या बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या धम्म परिषदेचे उद्घाटन पुज्य भिक्खू करूणानंद महाथेरो (संचालक, द ग्रेट हॅपिनेस चॅनल) यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पुज्य भिक्खू धम्मशील (हिंगोली, बीड) आणि पुज्य भिक्खू पय्यावर्धन (हिंगोली) यांची प्रमुख उपस्थिती लाभली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभुषण पुरस्कार प्राप्त स्मृतीशेष शंकरराव जगतकर नगरी, चांदापुर (परळी वै.) येथे ही धम्म परिषद आयोजित करण्यात आली होती.

मागील ११ वर्षांपासून बौद्ध धम्म उपासकांसाठी नांवारूपास आलेले सुप्रसिद्ध तीर्थक्षेत्र



तक्षशिला बौद्ध धम्म प्रशिक्षण प्रतिष्ठाण चांदापूर, जेतवन (ता.परळी, जि.बीड) यांच्या वतीने तालुक्यातील चोखामेळा सहकारी सोसायटी, वसंतनगर तांडा, मौजे चांदापूर (ता.परळी) येथे शनिवारी डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त स्मृतीशेष शंकरराव जगतकर नगरी येथे बाराव्या बौद्ध धम्म परिषदेची सुरूवात पंचरंगी धम्म ध्वजारोहणाने करण्यात आली. या परिषदेस भिक्खू करूणानंद महाथेरो, पु.भिक्खू धम्मशील, पु.भिक्खू पय्यावर्धन (हिंगोली) यांचे अनमोल धम्म मार्गदर्शन लाभले. त्यांच्या प्रवचनातून समाजात धम्म, समता, बंधुता आणि करूणेचा संदेश देण्यात आला. यावेळी धम्म परिषदेचे कार्यवाह ऍड.अनंतराव जगतकर, ले.कर्नल डॉ.एम.एच.कांबळे (अंबाजोगाई), डॉ.राजेश इंगोले (सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ), संग्राम गित्ते (सरपंच, चांदापूर), सौ.शाहू विजय राठोड (सरपंच, वसंतनगर तांडा), आनंद तुपसमुद्रे (बौद्धाचार्य, परळी वै.), मिलिंद नरबागे (परळी वै.), आनंद वाघमारे (समाजभूषण, पट्टीवडगाव), प्रशांत गित्ते (चांदापूर), सुरेश मिसाळ (घाटनांदूर) आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी सरोजाताई गौतम डावरे, अर्चनाताई महेंद्र रोडे, नितीन नामदेव रोडे, महादेव नागनाथ रोडे, कविताताई अनंत इंगळे, तसेच परळी नगरपरिषदेचे नवनिर्वाचित नगरसेवक – नगरसेविका यांचा विशेष सत्कार करण्यात आला. या प्रसंगी धम्म देसना देताना पुज्य भिक्खू करूणानंद महाथेरो म्हणाले की, भारत ही बुद्धभूमी आहे. सम्राट अशोक यांनी भारतासह जगात बुध्द धम्म रूजविला. तर महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बुध्द धम्माचे पुनरूज्जीवन केले. त्यामुळे जगाला युद्धाची नाही तर बुध्दाची, शांतीची, डॉ.बाबासाहेबांच्या विचारांची जगाला गरज आहे. धम्म आचरणाने माणूस सदाचारी बनतो. धम्मात प्रज्ञा–शील–करूणा–समता आहे. धम्मच जगाला तारू शकतो. म्हणून मला बुद्ध प्रिय आहे असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले आहे. येणाऱ्या पिढ्यांवर धम्म संस्कार करणे, धम्मावर श्रध्दा ठेवणे,

# बाणाई महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्यावतीने महिलांचा सन्मान



## विशेष महिलेचा केला साडी–चोळी देवून गौरव

**बीड शहरातील लिंबाबाई कांबळे या विविध शाळेत गोळ्या–बिस्कीटे विकून आपली उपजिवीका भावगतात, शाळेतील मुलांकडे खाऊ घेण्यासाठी जरी पैसे नसले तरी त्या निरागस बालकांना प्रेमाची उब देवून त्याचे तोंड गोड करतात. अशा महिलेचा सन्मान होणे ही भावना बाणाई महिला सेवाभावी बहुउद्देशीय संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा यांनी ओळखली आणि खर्या अर्थाने त्यांचा सन्मान होणे महत्वाचे असल्याचे नमुद करुन लिंबाबाई कांबळे यांना संस्थेच्यावतीने साडी–चोळी, संस्थेचे प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले. यावेळी सर्व महिला–भगिनींनी त्यांचे स्वागत केले.**

**बीड । प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून बानाई महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने विविध क्षेत्रात कार्य करणार्या महिला–भगिनींचा सन्मान आयोजक तथा संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा मीनाक्षी देवकते–डोमाळे यांच्या पुढाकाराने करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून ओबीसी नेत्या सुशीलाताई मोराळे यांच्या हस्ते महिलांना सन्मानित करण्यात आले.

बीड शहरातील सिध्दीविनायक कॉम्प्लेक्स परिसरात असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात झाली. हा महिला दिनाचा कार्यक्रम स्त्री शक्तीचा सन्मान करणारी ठरली. या आगळ्या–वेगळ्या कार्यक्रमात पोलीस हवालदार अशा शिरसाट, नायब तहसीलदार लता शिरसाठ, अंगणवाडी सेविका छाया थोरात, अंगणवाडी सुपरवायझर कावेरी खांडे, बौध्द परिषदेच्या सदस्य मंदाताई मस्के, समाजसेविका कावेरीताई जाधव, रील स्टार कोमल ताई, प्रहार संघटनेच्या जिल्हा अध्यक्ष उजगरे ताई, पोलीस हवलदार अनुराधा गव्हाणे, संभाजी ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्ष कमलताई निंबाळकर, सविता जैन, यांच्यासह विविध क्षेत्रांतील कर्तृत्ववान महिलांचा गौरव करण्यात आला. प्रशासकीय सेवेपासून ते समाजसेवा आणि सोशल मीडियापर्यंत सर्व क्षेत्रांतील महिला भगिनींना प्रमाणपत्र देऊन दिलेला हा सन्मान समाजासाठी प्रेरणादायी असल्याची भावना ओबीसी नेत्या प्रा.सुशीलाताई मोराळे यांनी यावेळी व्यक्त केली.

# निर्णय स्वातंत्र्य व आर्थिक स्वातंत्र्यातूनच महिलांचे सक्षमीकरण-अंजली धानोरकर

## बलभीम महाविद्यालयात महिला कक्षाच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त महिला सक्षमीकरणावर आयोजित राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटन समारंभात प्रतिपादन

**बीड । प्रतिनिधी**

आज अनेक क्षेत्रात महिला आपल्या कर्तुत्वाने यशस्वी नेतृत्व करतांना दिसतात कारण महिलांना जर संधी दिली तर निश्चितच त्या संधीचे सोने करतात यासाठी त्यांना पाठबळ देणे तसेच त्यांच्याविषयीच्या समाजात प्रचलित असलेल्या धारणा बदलणे व त्यांना निर्णय प्रक्रियेत व आर्थिक बाबतीत स्वातंत्र्य देणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन छत्रपती संभाजीनगर येथील अप्पर जिल्हाधिकारी तथा सुप्रसिद्ध साहित्यिक अंजली धानोरकर यांनी केले. येथील बलभीम कला, विज्ञान



व वाणिज्य महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर यांच्या सहकार्याने महाविद्यालयातील महिला कक्षाच्या वतीने दि. ७ मार्च रोजी 'स्वयंरोजगाराद्वारे सक्षमीकरण: लघु उद्योगांमध्ये महिलांची नेतृत्व भूमिका ' या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्राच्या उद्घाटन समारंभात त्या उद्घाटक व बीजभाषक म्हणून बोलत होत्या. समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.संतोष उंदरे होते, प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालय विकास समिती नि.सदस्य डॉ. कृष्णा केंडे यांची उपस्थिती होती तर मंचावर उपप्राचार्य डॉ.बाबासाहेब कोकाटे, क.म.उपप्राचार्य डॉ.संतोष डुबल, महिला कक्ष समन्वयक डॉ. ललिता राठोड, संयोजक डॉ. संदीप परदेशी यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी डॉ. कृष्णा केंडे आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की, लघुउद्योगांमध्ये महिलांचा सक्रीय सहभाग असून महिलांनी तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून स्वतःला अद्ययावत करावे परंतू तंत्रज्ञानाचा वापर करतांना काळजीपूर्वक करावा कारण तंत्रज्ञान हे दुधारी शस्त्र आहे हे सांगून त्यांनी यशस्वी महिलांची उदाहरणे दिली. आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात प्राचार्य डॉ.संतोष उंदरे म्हणाले की, प्रत्येक क्षेत्रात महिला आघाडीवर असून जर महिलांच्या हातात अर्थकारण आले तर कुटुंबाचा,समाजाचा व देशाचा विकास होईल. सुरूवातीस चर्चासत्राच्या संयोजक सचिव डॉ. ललिता राठोड यांनी चर्चासत्र आयोजनामागील भूमिका प्रास्ताविकातून मांडली. या समारंभाचे सूत्रसंचालन प्रा. अश्विनी वावरे यांनी केले तर आभार डॉ. सुनिता भोसले यांनी मानले. या चर्चासत्रासाठी विषय प्रवर्तक म्हणून र.भ.अट्टल महाविद्यालय,गेवराई प्राचार्य प्रो. डॉ. रजनी शिखरे व बालाजी इव्हेंट मॅनेजमेंटच्या ओनर श्रीमती दिपाली देशपांडे यांनी महिला सक्षमीकरण व लघुउद्योगांमध्ये महिलांची नेतृत्व भूमिका या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले. तर सत्राध्यक्ष म्हणून महिला महाविद्यालय, बीड येथील प्राचार्य डॉ. संध्या आयस्कर व माजलगाव येथील सुप्रसिद्ध उद्योजिका श्रीमती कुशा राठोड यांनीही मार्गदर्शन केले. समारोप समारंभात प्रमुख अतिथी म्हणून राजस्थान महाविद्यालय, वाशिम येथील प्राचार्य डॉ. ओमप्रकाश झंवर यांनी कर्तुत्ववान महिलांच्या कार्याचा परिचय करून दिला. जागतिक महिला दिनाच्या पुर्वसंध्येला आयोजित या राष्ट्रीय चर्चासत्रातून महिलांची लघु उद्योगांमध्ये तसेच इतर क्षेत्रात असणारी नेतृत्व भूमिका व वर्तमान कालखंडात महिलांच्या सक्षमीकरणासाठी उपाययोजना, अडचणी, प्रश्न व समस्या यावर सविस्तर विचारमंथन झाले.

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • सोमवार दि. ०९ मार्च २०२६ •

## थोडक्यात...

### केज मतदार संघातील दोन रस्त्यांच्या सुधारणेसाठी २५ कोटींच्या निधीची तरतूद

**आ. नमिता मुंदडा यांच्या पाठपुराव्याला यश**



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

केज मतदार संघातील दळणवळणाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आमदार नमिता मुंदडा यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश आले आहे. मार्च २०२६ च्या अर्थसंकल्पीय नियोजनात केज आणि अंबाजोगाई तालुक्यातील दोन प्रमुख रस्ते कामांसाठी २५ कोटींच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. प्रस्तावित कामांनुसार धारूर, तांदळवाडी, उंदरी, कळब, अंबा आणि होळ या गावांना जोडणाऱ्या मार्गावरील ९.५० किलोमीटर लांबीच्या रस्त्यासाठी रुंदीकरणासह सुधारणा करण्यात येणार आहे. या कामासाठी १० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. हा रस्ता सुधारण्यासाठी प्रदीर्घ काळापासून मागणी होत होती. त्याचप्रमाणे, अंबाजोगाई तालुक्यातील नागापूर, साकूड ते अंबाजोगाई या दरम्यानच्या १५ किलोमीटर लांबीच्या रस्त्याचेही रुंदीकरण व सुधारणा करण्याचे काम अर्थसंकल्पात प्रस्तावित करण्यात आले असून त्यासाठी १५ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद देखील करण्यात आली आहे. आमदार नमिता मुंदडा यांनी या कामांसाठी संबंधित विभागांकडे सातत्याने मागणी लावून धरली होती. या दोन्ही कामांची एकूण लांबी २४.५० किलोमीटर असून, राज्य महामार्ग आणि मुख्य जिल्हा मार्ग अंतर्गत ही विकासकामे पूर्ण केली जाणार आहेत. या रस्ते सुधारणेमुळे ग्रामीण भागातील दळणवळण सुलभ होणार असून स्थानिक व्यापार आणि प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. यासाठी मुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री पंकजाताई मुंडे यांचे आमदार नमिता मुंदडा यांनी आभार मानले आहेत.

# HVP लस घेऊ नका; हि लस लोकसंख्या कमी करण्याचं षडयंत्र: राजेंद्र आमटे

### करोना प्रमाणे षडयंत्र आहे ; लेकी वाचवा

**बीड । प्रतिनिधी**

अनेक शाळा महाविद्यालयामध्ये पंधरा वर्षांपुढील मुलींना HVP लस दिली जात आहे. कोणत्याही पालकांनी आपल्या मुलीला ही लस देऊ नये हे लोकसंख्या कमी करण्याचे खूप मोठे षडयंत्र आहे, कोरोना हे लोकसंख्या कमी करण्याचा षडयंत्र होते हे एपस्टीन फाइल मध्ये उघड झाले आहे. तसंच क्तझ लस सुद्धा एक षडयंत्र आहे. करोना फाईल मध्ये नाव आलेले बिल गेस्ट हा अतिशय पाताळ यंत्र माणूस आहे आणि ह्या बिल गेस्ट याला जगाची लोकसंख्या कमी करायची आहे. कोरोनाच्या नावाखाली अनेक नागरिकांना लसीकरण केलं. रेमडीसीवर सारखी घातक इंजेक्शन आहे वापरून अनेकांचा जीव घेण्याचे काम या इजराइल मधल्या येहुदी १३ कुटुंबीयांच्याच्या वतीने एलुमिनिटी सारखी पाताळ यंत्र संघटना चालवली जाते. या सर्वांना जगाची लोकसंख्या कमी करायची आहे म्हणून आता कोरोना नंतर एच व्ही पी लसीकरण देण्याची खूप मोठे षडयंत्र भारतात राबवले जात आहे. तरी सर्व पालकांना विनंती की बाबांनो आपली लेकरं वाचली पाहिजेत शाळेत सर्वांना सूचना द्या की पालकाच्या सूचने शिवाय की पालकाच्या सहमतीशिवाय कोणतीही लसीकरण घेऊ नका आणि सर्व पालकांना विनंती की आपल्या लेकरांना कोणतेही लसीकरण देऊ नका सरकार हे इजराइल इशाऱ्यावर चालणाऱ्या आहे त्यामुळे तात्काळ सर्वांनी ही लस आपल्या लेकरांना देऊ नका लेकरं वाचवा हि सर्वांना राजेंद्र आमटे यांच्या वतीने विनंती करण्यात येत आहे.



# शाळेचे गेट कोसळून विद्यार्थी जखमी

### मुख्याध्यापक व शिक्षकांचा निष्काळजीपणा;शाळेतील सुरक्षा रामभरोसे

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील बार्शी नाका परिसरातील जिल्हा परिषद शाळेत धक्कादायक घटना घडली असून शाळेचे लोखंडी गेट अचानक कोसळल्याने अर्शलान बागवान हा विद्यार्थी जखमी झाला आहे. जखमी विद्यार्थ्याला तातडीने बीड येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार विद्यार्थी गेट उघडण्यासाठी धावत गेले असता अचानक शाळेचे गेट कोसळले. या दुर्घटनेत एक विद्यार्थी गंभीर जखमी झाला. घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली असून जखमी विद्यार्थ्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. सुदैवाने मोठा अनर्थ टळला असला तरी विद्यार्थ्याच्या जीवाला धोका



निर्माण झाला होता. या घटनेमुळे शाळेतील सुरक्षा व्यवस्थेवर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. गेटची अवस्था जीर्ण असतानाही त्याची दुरुस्ती किंवा सुरक्षिततेची कोणतीही उपाययोजना करण्यात आली नसल्याचा आरोप पालकांकडून केला जात आहे. मुख्याध्यापक व शिक्षकांच्या निष्काळजीपणामुळे विद्यार्थ्याच्या जीवावर बेतण्याची वेळ आल्याची संतप्त प्रतिक्रिया पालकांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, या घटनेची सखोल चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी पालक व नागरिकांकडून होत आहे. तसेच शाळांमधील सुरक्षा व्यवस्थेचा तातडीने आढावा घेण्याचीही गरज व्यक्त केली जात आहे.

# संतोष देशमुख हत्या प्रकरणातील एक आरोपी काही तासांसाठी बाहेर येणार...

### १४ महिन्यांनंतर आरोपी जेलच्या बाहेर येणार ;पोलिसांचा राहणार तगडा बंदोबस्त

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील राजकीय आणि सामाजिक वर्तुळात मोठी खळबळ उडवून देणाऱ्या सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाने पुन्हा एकदा सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

सरपंच देशमुख हत्या हत्या झाल्यानंतर आरोपींना अटक करण्यासाठी अवघ्या महाराष्ट्रात आंदोलन मोर्चे झाले होते. या हात्येचा खटला विशेष सरकारी वकील उज्वल निकम यांनी लढावा अशी मागणी देशमुख कुटुंबीय व आंदोलनकर्त्यांनी केली होती. त्यामुळे हा खटला विशेष सरकारी



वकील उज्वल निकम यांच्याकडे आहे. या प्रकरणाची महत्त्वाची सुनावणी नुकतीच जिल्हा व विशेष न्यायालयात पार पडली असून, खटल्यातील कायदेशीर घडामोडींना वेग आला आहे.

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचा खटला सध्या अंतिम टप्प्यात असून संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष या निकालाकडे लागले आहे. नुकत्याच झालेल्या सुनावणीत न्यायालयाने या प्रकरणाची पुढील तारीख २४ मार्च निश्चित केली आहे. दरम्यान, या सुनावणीदरम्यान एका नव्या अर्जामुळे चर्चेला उधाण आले. या प्रकरणातील मुख्य आरोपींपैकी एक असलेल्या जयराम चाटे याने न्यायालयाकडे विशेष विनंती अर्ज दाखल केला होता. आपल्या भावाचे निधन झाल्यामुळे त्यानंतरचे धार्मिक विधी पार पाडण्यासाठी काही काळासाठी बाहेर जाण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी त्याने केली होती.

या अर्जावर सुनावणी करत न्यायालयाने १३ मार्च रोजी सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत जयराम चाटे याला कडक पोलीस बंदोबस्तात धार्मिक विधीसाठी उपस्थित राहण्याची परवानगी दिली आहे. तब्बल १४ महिन्यांनी देशमुख हत्तीतील आरोपी बाहेर येणार असून पोलीसांचा तगडा बंदोबस्त राहणार आहे.

न्यायालयाने केवळ परवानगी दिली नाही, तर त्यावर काही कडक ताशेरे आणि अटीही लादल्या आहेत. आरोपीला संरक्षण देण्यासाठी तैनात केल्या जाणाऱ्या पोलीस पथकाचा सर्व खर्च जयराम चाटेला स्वतःला करावा लागणार आहे. दुपारी ४ वाजेपर्यंत कोणत्याही परिस्थितीत त्याला पुन्हा कारागृहात हजर व्हावे लागेल. या काळात कोणतीही प्रक्षोभक कृती किंवा नियमांचे उल्लंघन झाल्यास त्याची गंभीर दखल घेतली जाईल. या पार्श्वभूमीवर १३ मार्च रोजी संबंधित ठिकाणी पोलीस प्रशासनाकडून कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात येणार असल्याची माहिती मिळत आहे. या प्रकरणातील पुढील सुनावणी २४ मार्च रोजी होणार असून, अंतिम निकालाकडे जिल्ह्यासह राज्याचे लक्ष लागले आहे.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली काठोडा येथे युवासेना शाखेचे उद्‌घाटन



### मंत्री संजय राठोड साहेबांचे बाजीराव चव्हाण (युवासेना मराठवाडा निरीक्षक) यांच्या वतीने जंगी स्वागत

**गेवराई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे साहेब यांच्या नेतृत्वाखाली युवासेना शाखा काठोडा चे उद्धाटन डॉ. श्रीकांत शिंदे साहेब (युवासेना मार्गदर्शक व खासदार) व पुर्वेशजी सरनाईक (युवासेना कार्याध्यक्ष) यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मा. ना. श्री. संजय राठोड साहेब (मृद व जलसंधारण मंत्री) यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी मंत्री संजय राठोड साहेबांचे बाजीराव चव्हाण (युवासेना मराठवाडा निरीक्षक) यांच्या वतीने जंगी स्वागत करण्यात आले. या प्रसंगी मनोज शिंदे (शिवसेना संपर्क प्रमुख), अविनाश जाधव (युवासेना मराठवाडा निरीक्षक), सुमित कोळपे (युवासेना जिल्हाप्रमुख), उद्धव मडके (शिवसेना तालुका प्रमुख), महादेव मातकर (शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष जिल्हाध्यक्ष), लिंबाजी जाधव (मोरगावचे विद्यमान सरपंच), डॉ. ज्ञानेश्वर जाधव (युवा उद्योजक), शेखर पवार (युवानेते), बिभीषण मोघे (युवासेना तालुकाप्रमुख), संतोष किरकट (शाखा अध्यक्ष), सुमंत घाटुळ (शाखा उपाध्यक्ष), भाऊसाहेब खवणे (शाखा सचिव) तसेच इतर पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.



*बीड शहरातील विविध भागातून गोळा केलेला कचरा खंडेश्वरी मंदिर (खिंड) परिसरात मोठ्या प्रमाणात टाकण्यात आल्यामुळे निर्माण झालेल्या अस्वच्छतेच्या पार्श्वभूमीवर आ विजयसिंह पंडित साहेब,नगराध्यक्ष प्रेमलताताई पारवे,उपनगराध्यक्ष विनोद मुळूक,प्रतिनिधी शेख मुजीबभाई, गटनेता फारूक पटेल, नगर सेवक अमर नाईकवाडे व इतर नगरसेवक,मुख्याधिकारी परिसराची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली होती त्याच अनुषंगाने आज रविवारी स्वच्छता सभापती शेख निजाम व स्वच्छता विभागाच्या पुढाकाराने खिंड परिसरातील कचरा उचलण्याचे काम बुधवारच्या अगोदरच सुरू करण्यात आले असून हा सर्व कचरा नाळवंडी नाका येथील डंपिंग ग्राउंडमध्ये टाकण्यात येत आहे. नागरिकांनी जास्तीत जास्त घंटा गाडीत कचरा टाकवा.बीड शहर स्वच्छ, सुंदर ठेवण्यासाठी नगरपरिषदेच्या वतीने सातत्याने प्रयत्न सुरू आहेत..*

# महिलांनी राजकारण बदलायला राजकारणात यावे : भीम रासकर

### महिला सक्षमीकरणाचा संदेश देणारा माजलगाव विकास प्रतिष्ठानचा महिला मेळावा उत्साहात

**माजलगाव । प्रतिनिधी**

महिलांनी समाजातील बदल घडवण्यासाठी राजकारणात सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. राजकारण बदलायचे असेल तर महिलांनी स्वतः राजकारणात उतरले पाहिजे, असे प्रतिपादन महिला राजसत्ता आंदोलनाचे भीम रासकर यांनी केले. ते माजलगाव विकास प्रतिष्ठानतर्फे आयोजित महिला मेळाव्यात बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंगलाताई सोळंके या होत्या. कार्यक्रमाची सुरुवात आम्ही घासून ठेवली ग्रामसभेची तलवार या प्रेरणादायी गीताने झाली. रेखा होके यांच्या मार्गदर्शनाखाली सिंदफणा पब्लिक स्कूलच्या विद्यार्थिनींनी उत्कृष्ट नृत्य सादरीकरण केले. तसेच सखाराम जोशी आणि प्रवीण मडके यांच्या दिग्दर्शनाखाली सामाजिक आशयाचे पथनाट्य लढा महिला राजसत्तेचा शाळेच्या शिक्षिकांनी सादर केली. माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या सचिव नीला देशमुख यांनी प्रास्ताविकातून संस्थेच्या कार्याचा आढावा मांडला. ड. पल्लवी सोळंके यांनी शक्ती कायदा याबाबत महिलांना सविस्तर माहिती दिली. आपल्या भाषणात भीम रासकर यांनी महिलांना प्रेरणा देताना आम्ही सख्या नाही पण पक्क्या बहिणी, सांदी कोपऱ्यात राहायचं नाय, राज्य करायला घाबरायच नाय, अशा घोषणांनी महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला. महिला राजसत्तेसाठी आपण सर्वतोपरी मदत करू असे त्यांनी जाहीर केले. अनेक महिला सरपंचांच्या चातुर्याचे अनुभव सांगत महिलांनी व्यापक राजकारणावरही बोलले पाहिजे, असे त्यांनी सांगितले. प्रत्येक महिलेनं किमान



एक सत्ता केंद्र काबीज करण्याचा प्रयत्न करावा, ग्रामपंचायतीचे काम प्रत्यक्ष पाहावे आणि विरोधकांशी संवाद साधायला शिकावे, असेही त्यांनी नमूद केले. महिलांच्या चारित्र्यावर अनेकदा हल्ले केले जातात, मात्र अशा वेळी खंबीरपणे उभे राहणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. समाजातील स्वावलंबी महिलांचा सत्कार व्हावा आणि महिलांनी जे जमत नाही तेही करून दाखवावे, असे आवाहन त्यांनी केले. महिलांचा खरा दागिना म्हणजे ताठ मान आणि ताठ कणा असे प्रभावी प्रतिपादनही त्यांनी केले. कृषी विज्ञान केंद्र, सगरोळीच्या संचालिका डॉ. माधुरी रेवणवार यांनी आपल्या भाषणात ज्ञान आणि विज्ञान यांच्या साहाय्याने सेंद्रिय शेती करणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. शेतीतील उत्कृष्ट कार्याबद्दल ज्ञानगंगा शेतकरी बचत गट तसेच हिरकणी महिला शेतकरी गटाचा सत्कार करण्यात आला. प्रीती कदम यांचा सेंद्रिय शेती करत असल्यामुळे सत्कार करण्यात आला. यावेळी माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या 'दिशा परिवर्तनाच्या' या वार्षिक अंकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. माजलगावच्या नगराध्यक्षा शिफा चाऊस यांनी मनोगत व्यक्त करताना मी नगराध्यक्षा असले तरी त्यापूर्वी आई, बहीण आणि सून आहे. त्यामुळे तुमचे दुःख हे माझे दुःख आहे, असे भावनिक मत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी ड. पल्लवी सोळंके, मस्साजोगच्या सरपंच वर्षा सोनवणे, समाजसेवक धनंजय देशमुख, कवी प्रभाकर साळेगावकर, डॉ. जनक चौरे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिंदफणा पब्लिक स्कूलच्या शिक्षिका शालिनी गडाख आणि अनुराधा सोळंके यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. वरुण तौर यांनी मानले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात मंगलाताई सोळंके यांनी माजलगाव विकास प्रतिष्ठान असेच सामाजिक उपक्रम घेत राहील अशी ग्वाही दिली. कार्यक्रमाची सांगता संघटनेची ढाल गीताने झाली. माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या संघटिका उर्मिला चोपडे, शोभा डाके,प्रभा गंगणे आणि राधा शिंदे यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मेहनत घेतली.